क्रिडा विशेष समितीची सोमवार दिनांक 17.07.2017 रोजी दुपारी 3.30 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**सभेत मा.सभापती श्री.नागेश सहारे यांचे सह मा.उप सभापती श्री. प्रमोद तभाणे, विशेष आमंत्रित मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी मा.सभापती शिक्षण विशेष समिती श्री. दिलीप दिवे, व श्री. सुनिल हिरणवार, मा.सभापती सतरंजीपुरा झोन व समितीचे सदस्य श्री. संजय चावरे, व मा.सदस्य श्री. प्रदीप पोहाणे, मा.सदस्या श्रीमती नेहा वाघमारे, मा.सदस्य श्री. दिनेश यादव, आणि विभागाकडून शिक्षणाधिकारी, सहा.शिक्षणाधिकारी, क्रिडा निरीक्षक, सर्व शाळा निरीक्षक, शारीरिक शिक्षण शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला सर्व समिती सदस्य आणि उपस्थित शारिरीक शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा निरीक्षक यांचा परिचय करून घेण्यात आला.

सुरूवातीला मा. शिक्षणाधिकारी यांनी प्रास्ताविक करतांना सांगितले की युग बदलत आहे त्यानुसार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत क्रिडा क्षेत्रातील कलागुणांना सुध्दा वाव दयावा लागेल. याकरिता प्रत्येक शाळेचा विद्यार्थ्यांचा कसा विकास होईल, त्यासाठी काय करावयाचे ते मनापासून ठरवावे लागेल. याकरिता प्रत्येक शिक्षकांना आपली मानसिकता बनवावी लागेल त्याशिवाय हे कार्य पुर्ण होणे शक्य नाही. क्रिडा विषयक बाबींचे नियोजन करावे लागेल त्या अनुषंगाने शिक्षण स्पर्धा, स्नेहसंमेलन, जिल्हा पातळीवरील स्पर्धा याबाबत समन्वय साधून सगळयांना लक्ष घालून सहभागी व्हावे लागेल असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी मागच्या वर्षी महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी कोणत्या खेळामध्ये, कोणत्या स्तरापर्यंत पोहचलेले आहेत त्याची संपुर्ण माहिती समितीला दिली.

त्यानंतर मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी सभेत सांगितले कि, क्रिडा समिती ही क्रिडा क्षेत्रात मनपा चे विद्यार्थी पुढे यावेत आणि शहराचा नाव लौकीक व्हावा म्हणून काम करीत आहे. म.न.पा. शाळेतील गरीब घरची मुले ज्यांच्या घरी शैक्षणिक वातावरण नसतांना यादृष्टीने आपण काही करू शकतो काय? म.न.पा. शाळेतील मुले खेळण्यामध्ये पुढे जावू शकतील यादृष्टीने काही करता येवू शकते काय? या मुलांना बाहेरचे व्यक्ति बोलावून ट्रेन करता येवू शकते काय?याबाबत जर काही सुचना असतील तर त्या देण्यात याव्यात त्यांचा सुध्दा विचार करण्यात येईल आणि जे जे करता येवू शकते ते सर्व प्रयत्न करण्यात येतील. या अनुषंगाने येत्या 15 दिवसांत नियोजन करून त्या अनुषंगाने कार्यरत व्हावे लागेल असेही ते म्हणाले.

तद्नंतर शारीरिक शिक्षकांनी सांगितले कि, विवेकानंद शाळेला मैदान नाही तेथे इंडोर गेम घेवू शकतो. शारीरिक शिक्षण शिक्षक श्री.नरेश सवायतुल यांनी सांगितले कि त्यांच्या शाळेतून राज्य स्तरावरच नव्हे तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू दिले आहे. इतर शाळेच्या, संस्थेच्या तुलनेत म.न.पा. शाळेतील मुले हे एक खेळाडू किंवा एक विद्यार्थी म्हणून कधीही मागे राहिलेले नाही. म.न.पा.ने सर्वोतोपरी खेळाडूंना घडविण्याकरिता प्रयत्न केलेले आहेत. फक्त म.न.पा.च्या क्रिडा विभागात आजपावेतो एक चांगला अधिकारी देण्यात आलेला नाही त्यामुळे हा विभाग मागे राहिलेला आहे तसेच या विभागाचे एक वार्षिक कॅलेंडर तयार असले पाहिजे की कोणत्या महिन्यात कोणकोणत्या ॲक्टिव्हिटी होणार आहे. याबाबत मागच्या वर्षी सुध्दा मी सुचना केलेली आहे जर वार्षिक कॅलेंडर तयार केले तर चांगल्या प्रकारचे खेळाडू विविध खेळामध्ये निर्माण करता येवू शकतील.

एक सुचना अशी आली की महानगरपालिकेत रोजंदारीवर जर जागा निघत असतील तर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये जे शिकलेले खेळाडू आहेत त्यांना 2 टक्के आरक्षण देवून त्यात त्यांना घेण्यात यावे जेणेकरून क्रिडा क्षेत्रात चांगल्या प्रकारे प्रोत्साहन मिळेल.

श्री.नितीन भोये शारीरिक शिक्षण शिक्षक यांनी वाल्मिकीनगर येथील शाळेला मैदान आहे परंतु ते खेळण्यायोग्य नाही असे सांगितले. वर्षभरापासून या बाबत पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्या मैदानाचे सपाटीकरण करून देण्यात यावे जेणेकरून म. न.पा.शाळेतील विद्यार्थ्यांमधून चांगले खेळाडू निर्माण करता येवू शकतील.

श्री.बन्सोड शारीरिक शिक्षण शिक्षक यांनी नेताजी मार्केट सिताबर्डी शाळेला मैदान नाही जे मैदान होते त्याचे सिमेंटीकरण करण्यात आले त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान राहिलेले नाही. याबाबत मुख्याध्यापक आणि मा.नगरसेवकांना सुध्दा कल्पना दिलेली आहे. मैदानामध्ये जे सिमेंटीकरण केले आहे ते काढून जर मैदान बनविले तर कबड्डीकरिता एक चांगले मैदान होवू शकते. तसेच त्याला लागून एक व्यायामशाळा आहे. त्या मैदानाचा भाग व्यायामशाळेत गेला आहे तेथे जर भिंत टाकली तर खो खो चे मैदान होवू शकते. या शाळेच्या मैदानाला समितीने भेट देवून त्याविषयी कार्यवाही करावी असेही ते म्हणालेत. सभेत एका शारीरिक शिक्षण शिक्षकांनी एक सुचना केली की यशवंत स्टेडियम येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या धर्तीवर एक स्पोर्ट स्कुल तयार करण्यात यावे आणि या स्कुलमध्ये एक्सपर्ट लोक ट्रेनिंग देण्यासाठी ठेवण्यात यावे. याकरिता अंदाजपत्रकात निधीची तरतूद करण्यात यावी आणि हा निधी बॅंकेत फिक्समध्ये टाकण्यात यावा आणि येणा–या व्याज्याच्या रकमेत क्रिडा स्पर्धा आयोजित करता येवू शकतात तसेच यशवंत स्टेडियमला जे दुकानदार आहेत त्यांच्याकडून येणारी भाडयाची रक्कम या स्पोर्ट स्कुलला देण्यात आली तर एका चांगल्या निधीची उपलब्धता स्पोर्ट स्कुलला होईल.

तद्नंतर मा.सभापती शिक्षण विशेष समिती श्री. दिलीप दिवे यांनी महापौर चषक वंदेमातरत स्पर्धेत मागच्या वर्षी म.न.पा.च्या 164 शाळेपैकी फक्त 65 शाळा सहभागी झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. याबाबत त्यांनी शारिरिक शिक्षकांकडून खुलासा मागितला असता संयुक्तिक खुलासा देण्यात आला नाही. त्यानंतर त्यांनी सांगितले कि, या वर्षी म.न.पा. च्या सर्व शाळांना त्या कोणत्याही माध्यमाच्या असोत त्यांना महापौर चषक वंदेमातरम स्पर्धेत भाग घ्यावयाचे आहे. भाग न घेणा–या शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकांवर कार्यवाही करण्यात येईल. यावर्षी अंदाजपत्रकात शिक्षण विभागाच्या क्रिडा विभागाकरिता चांगली तरतूद केलेली आहे करिता यावर्षी क्रिडा क्षेत्रात चांगले उपक्रम राबविण्यात यावे. म.न.पा. शाळेत 18 शारीरिक शिक्षक आहेत त्यांनी आपआपल्या शाळेचे वेळापत्रक तयार करावे आणि सगळया शाळा संमेलित होतील तसेच इतर कलाक्षेत्रात देखील म.न.पा. विद्यार्थ्यांचा सहभाग कसा राहील यासाठी प्रयत्न करावा जेणेकरून याचा चांगला मॅसेज नागरिकांपर्यंत जाईल आणि आपल्या शाळेचे नाव लौकीक होईल असेही त्यांनी सांगितले.

क्रिडा निरीक्षक श्री.चौधरी सभेच्या समारोप अंती सांगितले कि, प्रत्येक वर्षी विभागाकडून क्रिडा संबंधित स्पर्धा आणि कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शिक्षण विभागामार्फत क्रिडा सप्ताह सुध्दा राबविण्यात येतो त्यात आंतर शालेय क्रिडा स्पर्धा घेण्यात येतात आणि इतर मोठे कार्यक्रम सुध्दा आयोजित केले जातात. परंतु यात मुख्य अडचण जी भासते ती मैदानाची असते. यावर्षी एक चांगली समिती विभागाला लाभलेली आहे. त्यात खेळाडू असलेले सभापती आणि छत्रपती अवार्ड प्राप्त खेळाडू असलेले सदस्य लाभलेले आहे. क्रिडा विभागाला ज्या ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्या सर्व कमतरता समितीमार्फत दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी आशा करण्यात येते. सभेत क्रिडा निरीक्षक, शारीरिक शिक्षण शिक्षकांकडून चांगल्या सुचना आलेल्या आहेत त्या चांगल्या सुचनांचा अंतर्भाव करण्यात येईल. क्रिडा क्षेत्राशी जुळलेली सर्व ॲक्टीव्हिटी राबविण्यास विभागाला समितीच्या मदतीची आवश्यकता आहे. आपल्या मदतीने चांगल्या प्रकारचे कार्य करण्यात येईल असेही ते म्हणाले.

शेवटी मा.सभापती यांनी सभेत निर्देशित केले कि, महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी क्रिडा क्षेत्रातील कोणत्याही क्रिडा प्रकारात मागे राहणार नाही या अनुषंगाने समितीने पुर्ण नियोजन केलेले आहे अपंग खेळाडूंना सुध्दा क्रिडा क्षेत्रात प्रोत्साहन आणि सुविधा मिळवून देण्याकरिता समितीमार्फत ठोस पावले उचलणार आहे. क्रिडा क्षेत्राला प्रोत्साहन देत असतांना आपल्या महानगरपालिकेचे खेळाचे मैदान, इमारती यांचा विकास करण्याचे प्लॉनिंग सुध्दा करण्यात येईल जसे यशवंत स्टेडियम येथे स्पोर्ट स्कुल उघडण्याविषयी आलेली सुचना अत्यंत योग्य आहे. तसेच विभागाचे वार्षिक कॅलेंडर तयार करण्याबद्दलची सुचना सुध्दा अगदी योग्य आहे. क्रिडा विभागामार्फत घेण्यात येणा–या शालेय स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना काही ठराविक क्रिडा क्षेत्रापुरतेच प्रोत्साहन देण्यात येणार नाही तर सर्व क्रिडा प्रकारांना प्राधान्य

देण्यात येईल जेणेकरून सर्व क्रिडा क्षेत्रात म.न.पा.च्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून नागपूर शहराचे नाव क्रिडा क्षेत्रात पुढे येईल. सभेत शारीरिक शिक्षक यांच्या कडून आलेल्या सुचनांचे स्वागत करण्यात येते त्यांनी आपल्या सुचना लेखी स्वरूपात समितीला सादर कराव्यात. या अनुषंगाने उद्या सर्व क्रिडा क्षेत्रातील असोसिएशन, प्रशिक्षक आणि पत्रकार यांना बैठकीला बोलाविण्यात येत आहे. त्यांच्याकडून सुध्दा लेखी सुचना घेण्यात येतील आणि त्यानंतर सर्व प्रकारचे नियोजन करून त्या प्रमाणे समितीमार्फत विभागाला सुचना देण्यात येतील असे सुचित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**क्रिडा विशेष समिती**

किडा विशेष समितीची मंगळवार दिनांक 18.07.2017 रोजी दुपारी 3.30 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा.सभापती श्री.नागेश सहारे यांचे सह मा.उप सभापती श्री. प्रमोद तभाणे, मा. सभापती सतरंजीपुरा झोन व समितीचे सदस्य श्री. संजय चावरे, मा.सदस्या कु.विरंका भिवगडे मा.सदस्य श्री. दिनेश यादव, आणि विभागाकडून किडा निरीक्षक, शारीरिक शिक्षण शिक्षक व सर्व किडा क्षेत्रातील असोसिएशन, प्रशिक्षक वर्ग महाराष्ट्र ॲथ्लेटिक असो.चे सहसचिव डॉ.शरद सुर्यवंशी, बॅडमिंटन असो.चे सचिव श्री.मंगेश काशीकर, व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव श्री.सुनिल हांडे, जलतरण संघटनेचे सचिव डॉ.संभाजी भोसले, जिल्हा हॅन्डबॉल असोसिएशनचे,श्री.एस.टी. भोतमांगे, सीताराम भोतमांगे, समर्थ सायकल पोलो असोसिएशनचे सचिव बुरडे, पॅरा ॲथ्लेटिक असो.चे प्रविण उघडे, तलवारबाजी असो.चे सचिव मो.शोयेब, हौशी कबड्डी असो.चे सुनिल चिंतरलवार, विदर्भ हॉकी संघटनेचे अध्यक्ष राधेश्याम सारडा,श्री.स्वप्नील, श्री.राजेश रारोकर, श्री. प्रविण उखरे, श्री.गजानन बुरडे, श्री.देशपांडे, कु.स्नेहल भगत, ॲड.आशुतोष, श्री.रविंद्र टोंग, श्री. करूणाशंकर, श्री.कोल्हे, श्री.विजय नायडू, श्री.कपिल चुटेले, श्री.देवेंद्र वाघमारे, श्री.के.के.बरोट आदी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला सर्व समिती सदस्य आणि उपस्थित यांचा परिचय करून घेण्यात आला आणि त्यांच्याकडून सुचना आणि मार्गदर्शन मागण्यात आले.

सुरूवातीला महाराष्ट्र ॲथ्लेटिक असो.चे सहसचिव डॉ.शरद सुर्यवंशी यांनी सांगितले की राष्ट्रीय स्तरावर स्पर्धासाठी मदत करण्यात यावी. इंडोर प्रॅक्टीस करण्याकरिता खेळाडूंना निशुल्क किडा संकुल उपलब्ध करून देण्यात यावे. असोसिएशनला मैदान पुरविण्यात यावे. खेळासाठी मैदान आरखित ठेवण्यात यावे. म.न.पा.तर्फे वार्षिक समारंभ आयोजित करण्यात यावे त्यात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सर्व खेळाडूंचा सन्मान सोहळा घेण्यात यावा जेणेकरून किडा वातावरण तयार होईल. जिंकुन आलेल्या राष्ट्रीय आणि इतर स्तरावरील खेळाडूंची दखल घेण्यात यावी. म.न.पा. शाळेच्या मुलांमध्ये किडाप्रेम आणि दर्जा वाढण्याकरिता खेळ महोत्सव महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात यावे. त्यात शहरातील सर्व शाळांना आमंत्रित करण्यात यावे. या करिता जिल्हा संघटनेचे पंच पाठविण्याची व्यवस्था करू शकतो तसेच मैदाने जी काही व्यवस्था करावयाची राहील ती सर्व मदत करण्यात येईल. महानगरपालिकेच्या किडा शिक्षकांना जबाबदारी देण्यात यावी की त्यांनी सर्व असोसिएशनची समन्वय साधून ठेवावा असेही त्यांनी सांगितले.

बॅडमिंटन असो.चे सचिव श्री.मंगेश काशीकर यांनी सांगितले कि, शासनाच्या जी.आर. नुसार महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या 5टक्के किडेवर खर्च करणे बंधनकारक आहे. म.न.पा. शाळेतून पूर्वी ज्या शालेय स्पर्धा घेण्यात येत होत्या त्या बंद झालेल्या आहेत त्या सुरू करण्यात याव्यात. जेणेकरून म.न.पा.शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा पातळीवरच्या ज्या स्पर्धा होतात त्यात ते भाग घेवू शकतील. तसेच त्याप्रकारे त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. महानगरपालिकेतर्फे खेळांडूचा पूर्वी जसा सत्कार करण्यात येत होता त्याप्रमाणे त्यांचा सत्कार करण्यात यावा. दरवर्षी महापौर चषक आयोजित आयोजित करण्यात यावे.

महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी क्रिडा संकुल तयार करण्यात यावे तेथील रहिवाश्यांना त्याचा फायदा घेता येईल. मैदानी खेळामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग कमी राहतो त्याकरिता ज्या ज्या महानगरपालिकेच्या जागा आहेत त्या असोसिएशनला काही शुल्क आकारून वापरायला देण्यात याव्यात. 24 तारखेला बॅडमिटंनची राष्ट्रीय सभा घेत आहे या स्पर्धेला महानगरपालिकेकडून हातभार लावण्यात यावा असेही ते म्हणाले.

पॅरा ॲथ्लेटिक असो.चे प्रविण उघडे यांच्यामार्फत सांगण्यात आले कि, विकलांगांना खेळण्याकरिता प्रोत्साहित करण्यात यावे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता त्यांना आर्थिक मदत करण्यात यावी. ऑलिंम्पिकमध्ये भाग घ्यावयाचा असल्यास वेळेवर त्यांना कोणतीही मदत मिळत नाही. अशा खेळाडूचे पालकत्व महानगरपालिकेकडून घेण्यात यावे. तसेच असोसिएशनच्या कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करून दयावी.

विदर्भ हॉकी संघटनेचे अध्यक्ष राधेश्याम सारडा यांनी सांगितले कि, नागपूर शहराला ॲस्ट्रा टर्फची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी स्पोटर्स् सेक्रेटरीला महानगरपालिकेकडून पत्र देण्यात यावे.

लॉन टेनिसच्या असो.च्या प्रतिनिधीने सांगितले कि, लॉन टेनिसचे रामनगर येथे सेंटर चालवित आहे. तेथे राष्ट्रीय, राज्य स्तरावरील खेळ खेळले जातात. तेथील इन्फ्रास्कचरकरिता महानगरपालिकेमार्फत मदत करण्यात यावी. आम्ही या ठिकाणी महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना कोचिंग देवू तसेच टेनिस कोर्ट महानगरपालिकेच्या शाळेला सुध्दा तयार करण्यात यावे जेणेकरून तेथे येवून सुध्दा प्रशिक्षण देता येईल.

ॲड.आशुतोष यांनी टेबल टेनिसच्या संदर्भात सुचित केले की महानगरपालिकेच्या जेवढया शाळा रिकाम्या पडलेल्या आहेत. हॉल रिकामे आहेत त्या ठिकाणी टेबल टेनिस खेळण्याकरिता व्यवस्था करण्यात यावी. यशवंत स्टेडियममध्ये दोन हॉल आहेत त्याचा वापर सुध्दा टेबल टेनिसकरिता करता येवू शकतो. नागपूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात त्या त्या स्पोटर्स्करिता तरतूद करण्यात यावी. मोठमोठया स्पर्धेचे आयोजन महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे.

व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव श्री.सुनिल हांडे यांनी सुचविले कि, आऊटडोर गेम खेळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यात यावे. महानगरपालिकेतर्फे समर कॅम्प लावण्यात यावे त्यातील 21 विद्यार्थ्यांना निवडून त्यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण देण्याकरिता आम्ही प्रयत्नशील राहू.

जलतरण संघटनेचे सचिव डॉ.संभाजी भोसले यांनी सांगितले कि, महानगरपालिका अंतर्गत ज्या काही शाळा आहेत तेथील विद्यार्थ्यांची निवड करून त्या विद्यार्थ्यांना आमच्या पंचामार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संत तुकडोजी संकुल हे असोसिएशनला प्रशिक्षण देण्यासाठी देण्यात यावे. त्यावर जिल्हा कमेटीची जबाबदारी राहील. जे काही सहकार्य आम्हांला अपेक्षित आहे ते महानगरपालिकेकडून देण्यात यावे.

कराटे असो.चे श्री.राजेश रारोकर यांनी सांगितले की सेल्फ डिफेन्स्ची गरज आजच्या काळात मुलींना असल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेतील मुलींच्या प्रशिक्षणासाठी इन्फ्रास्क्चर तयार करून दिले तर प्रशिक्षण देवू शकतो.

कबड्डी असो.चे सुनिल चिंतरलवार यांनी सांगितले कि, खेळण्याकरिता आम्हांला जागा नाही चिटणीपुरा येथे जागा तसेच नंदनवन येथे राजीव गांधी हॉल उपलब्ध करून दिला तर खेळाला प्रोत्साहन मिळेल. आज चांगले खिलाडी तयार झाले आहेत परंतु त्यांना नोकरी नाही, आर्थिक बाजूमुळे खेळाला वाव नाही. नागपूर शहरात ज्या काही कंपन्या आहेत त्यांच्याशी संपर्क साधून जर त्यांना नोकरी मिळवून देण्यास प्रयत्न करण्यात आला तर त्यांना नोकरी मिळून आर्थिक मदत होईल.

असोसिएशनच्या एका प्रतिनिधीने सांगितले कि, महानगरपालिकेमार्फत उन्हाळयात प्रत्येक खेळाचे शिबीर घेण्यात यावे. जिल्हा संघटना, किडा मंडळे त्यात भाग घेतील त्यामुळे एक खेळाचे वातावरण तयार होईल. प्रत्येक महानगरपालिकेमार्फत असे शिबीर आयोजित केले जातात. ती किडा संस्कृति महापालिकेने सुध्दा राबवावी तसेच राष्ट्रीय,राज्य स्पर्धेकरिता महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करण्यात यावी.

बॉडी बिल्डर असो.च्या प्रतिनिधीमार्फत सांगण्यात आले कि, प्रत्येक झोन स्तरावर एक किडा संकुल तयार व्हावे. किडा संकुलासोबत फिजीकल फिटनेसच्या दृष्टीने एक उत्कृष्ठ जीम तयार झाले तर खेळाडूंना या क्षेत्रात खुप चांगल्या प्रकारचे प्रोत्साहन मिळेल.

असोसिएशनच्या एका प्रतिनिधीने सांगितले कि, महानगरपालिकेच्या मैदानावर अतिक्रमण मोठया प्रमाणात झाले आहे ते अतिक्रमण दूर करण्यात यावे.

डॉ.देवेंद्र वाघमारे यांनी सभेत सुचविले कि, नागपूर महानगरपालिकेचा किडा क्षेत्राशी संबंधित एक फ्युचर प्लॅन असावा. स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने एक किडा धोरण तयार करण्यात यावे. किडा सुविधा उपलब्ध करून दयाव्यात. किडांगणाचा उपयोग किडासाठीच करण्यात यावा. खेळाडूकरिता काही तरी उपकम तयार असले पाहिजे. ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, जिल्हा स्तरावर कामगिरी केली असेल आणि पदक मिळवून आणले असेल अशा खेळांडूकरिता शिष्यवृत्त्याचे प्रावधान असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरिता भाग घेण्या–या खेळाडूंना अनुदान देण्यात यावे. किडा शिक्षकांना आणि संस्थांना प्रोत्साहन मिळेल यादृष्टीने त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल पुरस्कार देवून प्रोत्साहन देण्यात यावे.

नागपूर फेसिंग असोसिएशनच्या प्रतिनिधीने सांगितले कि, या किडा प्रकारातील खेळ साहित्य अत्यंत महाग आहेत त्यामुळे या खेळाला खेळण्याकरिता प्रोत्साहन मिळत नाही. याकरिता नागपूर महानगरपालिकेतर्फे किडा साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे. महापौर चषक दहा दिवसाकरिता आयोजित करण्यात यावा आणि त्यात सर्व किडा प्रकाराला संधी देण्यात यावी. अशाप्रकारे नेहमी किडा महोत्सव साजरे करण्यात यावे.

श्री.रामटेके यांनी सभेत सुचित केले की उत्तर नागपूरमध्ये किडेसाठी कोणत्याही प्रकारे प्रोत्साहन देणारे संस्था राहिल्या नाही. किडा हा प्रकार उत्तर नागपूरमधून नाहीसा होणाच्या

पथावर आहे. उत्तर नागपूरातील मुलांना किडा प्रकारात प्रोत्साहन मिळेल याकरिता सर्व किडा असोसिएशननी प्रत्येक शाळेचे 5 विद्यार्थी घेवून त्यांना निशुल्क प्रशिक्षण द्यावे जेणेकरून या भागात किडाचा विकास व विस्तार होईल.

स्केटिंग असोसिएशनच्या प्रतिनिधीने सांगितले की स्केटिंग या किडा प्रकारात खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्केटिंग रिंग उपलब्ध होतील या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा. किडा प्रकारात येण्या–या खेळाडूंची संख्या रोडावलेली आहे. ज्याप्रकारे सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे त्याप्रकारे उपलब्ध होत नाही मॅराथन व रोड कॉम्पीटेशनमध्ये खेळाडू मागे जात आहे. स्केटिंग करिता रस्ता उपलब्ध होत नाही त्यामुळे स्पर्धेला वाव मिळत नाही. त्यांना प्रोत्साहन मिळेल यादृष्टीने सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात यावे. स्केटिंग करिता नागपूर महानगरपालिकेतर्फे एक असा रस्ता देण्यात यावे. तसेच जेथे गरज आहे तेथे स्केटिंग रिंग बनवुन देण्यात यावे जेणेकरून या खेळ प्रकाराला खुप मोठया प्रमाणात प्रोत्साहन मिळेल.

असोसिएशनच्या एका प्रतिनिधीने सांगितले कि, महानगरपालिकेच्या किडा संकुलमध्ये जे प्रशिक्षक उपलब्ध करून दिलेले आहे ते त्या दर्जाचे आहेत का?यादृष्टीने तपासले गेले पाहिजे.

स्नेहल भगत यांनी सांगितले की महानगरपालिकेच्या शाळेतील किडा शिक्षकांनी शाळेच्या मुलांना मैदानात खेळण्यासाठी घेवून जायला पाहिजे. यादृष्टीने नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील किडा शिक्षकांची सुध्दा बैठक लावण्यात यावी. चिटणीसपुरा पार्कच्या मागच्या बाजूचा अतिकमण आणि कचरा पडलेला आहे तो परिसर आधी स्वच्छ करण्यात यावा.

योग जिल्हा किडा असोसिएशनच्या प्रतिनिधीने सांगितले की संस्थेकडून नागरिकांना योगा प्रशिक्षण देण्यात येत आहे. संस्थेमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार होत आहेत. संस्थेला इंडोर जागा आणि योगासेट,मॅट उपलब्ध करून दयावे.

हॉकी असोसिएशनच्या प्रतिनिधीने सांगितले की गेल्या पाच वर्षापासून हॉकी टुर्नामेंट बंद झाल्या आहे त्या सुरू करण्यात याव्यात. असोसिएशनकडे ग्राऊंड उपलब्ध आहेत परंतु आर्थिक बाजू कमकुवत आहेत. स्ट्रफ नाही तसेच पाहिजे त्या सुविधा उपलब्ध नाहीत. हॉकी या किडा प्रकाराकरिता कोणीही स्पॉन्सरशिप मिळत नाही. या अनुषंगाने टायगर ग्राऊंडचा सुध्दा विकास करण्यात यावा.

विकांत स्पोटर्स् असोसिएशनच्या प्रतिनिधीमार्फत सांगण्यात आले कि उत्तर नागपूरातील खेळाडूंना मदतीचा हात देण्यात यावा. उत्तर नागपूरात खेळाचे मैदान खेळण्याकरिता राहिलेले नाही, उत्तर नागपूरात किडा प्रकाराकडे गांर्भियाने घेतले जात नाही. किडा क्षेत्रातील मान्यवरांनी उत्तर नागपूरात किडेच्या प्रगतीकडे लक्ष दयावे.

मा.उप सभापती प्रमोद तभाने यांनी पदाधिका–यांकडून आलेल्या सुचनांचे स्वागत करीत काही सुचनांवर तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले.

सरतेशेवटी मा. सभापती यांनी सुचित केले की स्थानिक क्रिडापटूंना वाव मिळावा, चांगले खेळाडू तयार व्हावे, हे उदिद्ष्ट समोर ठेवून मनपातर्फे नवीन क्रिडा धोरण तयार करण्यात येत आहे. क्रिडा संघटनेच्या सुचनांचा यांत समावेश करण्यात येईल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिडापटूंचा गौरव करण्यात येईल. मनपाच्या माध्यमातून शालेय स्पर्धा राबविण्याचे नियोजन करण्यासह नागपूर महानगरपालिकेच्या दहा झोनमध्ये एक मैदान विकसित करण्यात येईल. क्रिडापटूंना नोकरीत सामावून घेण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. क्रिडा संघटनांना आवश्यक ते सहकार्य करण्याची मनपाची तयारी असून त्यादृष्टीने आखणी करण्यात करण्यात येईल. विदर्भ हॉकी संघटनेच्या अमरावती रोडवरील मैदानावर हॉकी टर्फच्या उभारणीसाठी मनपातर्फे शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. नागपूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर क्रिडा संबंधित सर्व असोसिएशनची माहिती टाकण्यात येईल असे मा.सभापती यांनी उपस्थित पदाधिका–यांना आश्वासित केले.

शेवटी क्रिडा निरीक्षक यांनी सांगितले कि, झोनमध्ये स्पोटर्स् सेंटर सुरू करण्याचा मानस आहे त्याकरिता असोसिएशनी ग्वाही दिल्याप्रमाणे प्रशिक्षकांशी संपर्क साधण्यात येईल आणि त्यांनी निवड केलेल्या पाच शाळेच्या विद्यार्थ्यांना एक–एक तास प्रशिक्षण देवून त्यांना त्या क्रिडाप्रकारासाठी तयार करण्यासाठी मदत करावी तसेच शाळेतील क्रिडा शिक्षकांना सुध्दा या अनुषंगाने जबाबदारी देण्यात येईल असे सांगून उपस्थितांचे आभार मानून मा.सभापती यांच्या संमत्तीने सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**क्रिडा विशेष समिती**

**क्रिडा विशेष समितीची मंगळवार दिनांक 17.10.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री.नागेश सहारे यांचे सह मा.उप सभापती श्री. प्रमोद तभाणे, मा. सभापती सतरंजीपुरा झोन व समितीचे सदस्य श्री. संजय चावरे, मा.सदस्या कु.विरंका भिवगडे मा.सदस्य श्री. दिनेश यादव, मा.सदस्य श्री.प्रदीप पोहाणे आणि विभागाकडून क्रिडा निरीक्षक श्री.नरेश चौधरी, शाळा निरीक्षक श्री.हर्षल हिवरखेडकर व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. तद्नंतर मा. सभापती यांनी समितीमार्फत यावर्षी कोणत्या स्पर्धा आणि कार्यक्रम आयोजित करण्यात येतील या अनुषंगाने आढावा घेण्यास सुरूवात केली. नागपूर शहरातील वेगवेगळया क्षेत्रातील नामवंत व्यक्तिंचा गौरव सोहळा घेण्याविषयी प्रावधान उपलब्ध असून गौरव सोहळा घेण्याविषयी समितीत ठरविण्यात आले. अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा महापौर चषकाचा सुध्दा पाठपुरावा करून स्पर्धा घेण्याविषयी समितीत ठरविण्यात आले. अखिल भारतीय खो–खो स्पर्धा महापौर चषक तसेच नॅशनल सायकल पोलो स्पर्धा घेण्याविषयी समितीत ठरविण्यात आले. मा. सभापती यांनी या स्पर्धेव्यतिरिक्त आचर्री, शुटींग या खेळांकडे सुध्दा लक्ष देण्यात यावे आणि या खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्यात यावे असे सूचित केले जेणेकरून नागपूर शहरातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण होवू शकतील. त्यानंतर मा. उपसभापती श्री.प्रमोद तभाने यांनी सुचविल्याप्रमाणे महापौर चषक सुराज्य दौड क्रीडा घेण्याविषयी समितीत ठरविण्यात आले तर नागपूर जिल्हा स्तरीय कुस्ती प्रतियोगीता स्पर्धा घेण्याविषयी मा.नगरसेवक श्री.कमलेश चौधरी यांनी सूचित केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली. महिला कुस्ती प्रतियोगीतेविषयी सुध्दा पाठपुरावा करण्यात यावे असे मा.सभापती यांनी सूचित केले. नागपूर महानगरपालिकेतर्फे महापौर चषक विदर्भ शरीर सौष्ठ स्पर्धा, एकांकिका स्पर्धा महापौर चषक आणि अपंग खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल या दृष्टीकोनातून पॅराऑलम्पीक व्हॉलीबाल राज्य स्पर्धा व पॅराऑलम्पीक ॲथेलेटीक स्पर्धा शहर स्तरीय घेण्याविषयी समितीत ठरविण्यात आले. आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा घेण्याविषयी संबंधित फेडरेशनशी चर्चा करण्यात यावी असे मा.सभापती यांनी सूचित केले.

तसेच 26 जानेवारी रोजी नागपूर शहरातील रेशीमबाग मैदान किंवा यशवंत स्टेडियमवर बॅंड स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे व नागपूर महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिका–यांकरिता सुध्दा स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात असेही मा.सभापती यांनी संबंधितांना सूचित केले.

तद्नंतर मा.सभापती यांनी सांगितले कि, हे सगळे करीत असतांना नागपूर शहरात खेळाडूंना खेळण्यासाठी त्या त्या क्रिडाक्षेत्रातील मैदाने नाहीत, खेळाला आवश्यक इन्फ्रास्टक्चर नाही. त्यामुळे मैदानांचा विकास करण्याकरिता प्राधान्य देवून समितीच्या माध्यमातून मैदानांचा विकास करणे आणि आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत समितीला अधिकार प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. तसेच एखादया क्रिडा प्रकारात एखादा खेळाडू जखमी झाल्यास त्याला कुठल्याही प्रकारची मदत मिळत नाही याकरिता नागपूर शहरातील हद्दीतील सर्व खेळांडूकरिता काय काय करू शकतो? याबाबतचा प्रस्ताव करून मा.महापौरजी यांना सादर करण्यात यावा असे त्यांनी सुचित केले. त्यानंतर म.न.पा. शालेय स्तरावर विविध स्पर्धेचे आयोजन लवकरात लवकर करण्यात यावे असे सांगून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**क्रिडा विशेष समिती**